नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०७/०९/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

## खून

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०२ कि. मी अंतरावरील वार्ड क्र. १६, झेंडा चौक पहीलेपार सावनेर येथे दिनांक ०६/०९/२०२२ चे २२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— श्री. जगदीश भगवान सावजी, वय ५३ वर्ष, धंदा:—शेती, रा. वार्ड क्र. १७, पहीलेपार हरीभाउ आदमने कॉलेज जवळ सावनेर, ता. सावनेर जि. नागपूर यांचा भाचा नामे— नरसिंग उर्फ भुरु महादेव पहाडे (मृतक), वय ३४ वर्ष, रा. वार्ड क्र. १६ पहलेपार सावनेर हे दि. ०६/०९/२०२२ रोजी रात्री १०.०० वा. चे सुमारास दिपक लखनसिंग मेहंदुले, तुळशीराम व ईतर दोन यांचेशी बोलत असतांना त्यावेळी आरोपी क्र. १. अशोक किसन नुसाते, वय ५५ वर्ष, व २. अतुल गेंदालाल नुसाते, वय २१ वर्ष, दोन्ही रा. पहलेपार सावनेर हे तेथुन जात असता त्यांना नरसिंग उर्फ भुरु पहाडे हे टोमणे मारत असल्याचे वाटल्याने त्यांनी, 'तुम्ही मला पाहुन टोमणे मारता काय? थांब तुझ्याकडे पाहतो,' असे म्हणुन आरोपीतांनी त्यांचे घरी धावत जावुन गुप्तीसारखे हत्यार आणुन नरसिंग पहाडे याचे डोक्यावर, मानेवर गुप्तीसारखे हत्याराने वार करुन जीवे ठार मारले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सवनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३०२, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री निशांत फुलेकर मो.क्र. ७५८८५६४३०० हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत संचेती ले आउट काटोल येथे दिनांक ०६/०९/२०२२ चे ०१.०० वा. चे ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— अमोल बाबाराव भंबरे वय ३३ वर्ष, रा. सिव्हील लाईन कलेक्टर बंगला वर्धा ह. मु. संचेती ले आउट काटोल हे महालक्ष्मी जेवनाचे कार्यक्रमाकरीता त्यांचे काकाकडे आले असता व आपले काकाकडे आपले परीवारासह झोपले असता तसेच फिर्यादीचे काकाचे घरासमोर राहणारे अमित जयप्रकाश जैयस्वाल हे आपले परीवारासह घरी झोपले असता अज्ञात आरोपीने फिर्यादीचे बॅगमधुन ०१ तोळयाचे मंगळसुत्र कि ४०,०००/—रू., नगदी ३,०००/—रू. व अमित जयप्रकाश जैयस्वाल यांचे घरून किचन रूममधील लोखंडी कपाटातुन नगदी २०,०००/—रू. असा एकुण कि. ६३,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी निभोरकर हे करीत आहे.

# चोरी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील वित्तूबाबा मंदीराचे बाजूला टाकळघाट ता.हिंगणा जि.नागपुर येथे दिनांक ०५/०९/२०२२ चे २३.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— धनंजय दत्तात्रय माळवे, वय ४२ वर्ष, रा. सातगाव फाटा वर्धमान नगर, बुटीबोरी ता. जि. नागपूर हे टेक्नीशीयन म्हणुन काम करीत असलेल्या ए.टी.सी. टेलीकॉम टॉवर कंपनी टाकळघाट येथिल मोबाईल टॉवरला लावलेल्या एकुण २४ बॅटरी कि. १२,०००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार राठोड मो. क्र. ९८३४१८९२७५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**